# भारतीय राज्यघटनेच्या संदर्भात हक्क, नागरिकत्व आणि आधुनिक राज्यसंस्था : एक चिकित्सक अभ्यास

**मयुर श्रीकांत संकपाळ**, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर.

---

**सारांश :**

मानवी इतिहासाच्या प्रवासात हक्क, नागरिकत्व आणि राज्यसंस्था या संकल्पना एकमेकांशी घट्ट जोडलेल्या आहेत. प्राचीन काळापासून आधुनिक लोकशाही राष्ट्रांपर्यंत नागरिक आणि राज्य यांच्यातील संबंध सतत बदलत गेले आहेत. भारतासारख्या बहुसांस्कृतिक आणि बहुभाषिक देशात नागरिकत्व व हक्कांची संकल्पना विशेष महत्त्वाची ठरते. भारतीय राज्यघटनेने "आम्ही भारताचे लोक" या तत्त्वावर आधारित लोकसत्तेला केंद्रस्थानी ठेवून सर्व नागरिकांना समान हक्क दिले आहेत. जाती, धर्म, लिंग किंवा वंश यांच्या आधारावर होणाऱ्या भेदभावाला नाकारून समानता आणि न्यायाची मूल्ये प्रस्थापित करण्यात आली आहेत. भारतातील नागरिकत्वाची संकल्पना राज्यघटनेच्या भाग-२ (कलम ५ ते ११) मध्ये स्पष्ट करण्यात आली आहे. नागरिकत्व कायदा १९५५ नुसार जन्म, वंश, नोंदणी आणि नैसर्गिकीकरण या मार्गांनी नागरिकत्व मिळू शकते. भारताने संघराज्य असूनही एकेरी नागरिकत्वाचे तत्त्व स्वीकारले आहे, ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मता दृढ होते. तथापि नागरिकत्व दुरुस्ती कायदा २०१९ मुळे धर्मनिरपेक्षतेच्या प्रश्नावर वाद निर्माण झाले आहेत.

भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क (कलम १२ ते ३५) नागरिकांच्या स्वातंत्र्याचे आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण करतात. समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्ध हक्क, धर्मस्वातंत्र्य, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क आणि घटनात्मक उपायांचा हक्क हे भारतीय लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. सर्वोच्च न्यायालयाने विविध ऐतिहासिक निर्णयांद्वारे या हक्कांचा विस्तार केला असून खासगीपणाचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि गरिमायुक्त जीवनाचा हक्क यांसारख्या नव्या व्याख्या विकसित केल्या आहेत. आधुनिक राज्यसंस्था पारंपरिक "पहारेकरी राज्य" या संकल्पनेपासून पुढे जाऊन कल्याणकारी राज्याच्या रूपात विकसित झाली आहे. राज्याचे उद्दिष्ट केवळ कायदा व सुव्यवस्था राखणे नसून नागरिकांचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक कल्याण सुनिश्चित करणे आहे. संसदीय लोकशाही, स्वतंत्र न्यायपालिका आणि विविध घटनात्मक संस्था नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कार्यरत आहेत.

हक्क, नागरिकत्व आणि राज्यसंस्था यांचा परस्परसंबंध अत्यंत महत्त्वाचा आहे. नागरिकत्वामुळे व्यक्तीला हक्क प्राप्त होतात, तर राज्यसंस्था त्या हक्कांचे संरक्षण व अंमलबजावणी करते. त्याचवेळी लोकशाही व्यवस्थेत हक्क आणि कर्तव्यांचा समतोल राखणे आवश्यक असते. आरक्षण धोरणासारख्या उपाययोजनांद्वारे सामाजिक न्याय साधण्याचा प्रयत्न केला जातो. आधुनिक काळात जागतिकीकरण, डिजिटल तंत्रज्ञान, स्थलांतर, लैंगिक समानता, आदिवासी हक्क आणि पर्यावरणीय न्याय यांसारखी नवी आव्हाने नागरिकत्व आणि हक्कांच्या चर्चेत समोर येत आहेत. या परिस्थितीत राज्यसंस्थेने उत्तरदायी, समावेशक आणि नागरिकाभिमुख धोरणे स्वीकारणे आवश्यक आहे. एकूणच, भारतीय लोकशाहीचे यश हक्क, नागरिकत्व आणि राज्यसंस्था यांच्या समन्वयावर अवलंबून आहे.

**पारिभाषिक शब्द :-**

नागरिकत्व, मुलभूत हक्क, आधुनिक राज्यसंस्था, भारतीय राज्यघटना, लोकशाही, मार्गदर्शक तत्त्वे, नागरिक कर्तव्ये, सामाजिक न्याय, जागतिकीकरण, मानवी हक्क

**प्रस्तावना :-**

मानवी इतिहासाच्या दीर्घ प्रवासात राज्यसंस्थेची उत्क्रांती आणि नागरिकत्वाच्या संकल्पनेचा विकास हे दोन महत्त्वाचे धागे एकमेकांशी घट्ट गुंफलेले आहेत. प्राचीन ग्रीक नगर-राज्यांपासून ते आधुनिक लोकशाही राष्ट्रांपर्यंत, नागरिकाचे राज्याशी असलेले नाते सतत परिवर्तनशील राहिले आहे. भारतासारख्या बहुविध संस्कृती, भाषा, धर्म आणि परंपरा असणाऱ्या देशात नागरिकत्व आणि हक्कांची संकल्पना विशेषतः महत्त्वाची ठरते. भारताने 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य प्राप्त केले आणि 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय राज्यघटना अमलात आली. या राज्यघटनेत "आम्ही भारताचे लोक" या उद्गाराद्वारे सार्वभौम जनतेला सत्तेचे केंद्र मानले गेले. राज्यघटनेने एकाच वेळी सर्व नागरिकांना समान हक्क दिले, जे त्या काळातील जागतिक संदर्भात एक धाडसाचे पाऊल होते. जाती, धर्म, लिंग, वंश या आधारांवर होणाऱ्या भेदभावाला घटनात्मक मान्यता नाकारून समानतेचे तत्त्व स्थापित केले गेले. आधुनिक काळात राज्यसंस्थेच्या भूमिकेत आमूलाग्र बदल

झाले आहेत. केवळ कायदा व सुव्यवस्था राखणारी "पहारेकरी राज्यव्यवस्था" (Watchman State) आता कल्याणकारी राज्यव्यवस्थेत (Welfare State) रूपांतरित झाली आहे. नागरिकांचे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्क संरक्षित करणे ही राज्याची प्राथमिक जबाबदारी बनली आहे. डिजिटल क्रांती, जागतिकीकरण, हवामान बदल आणि स्थलांतराच्या लाटांमुळे नागरिकत्व आणि हक्कांच्या पारंपरिक संकल्पनांपुढे नवे प्रश्न उभे राहिले आहेत.

सदर संशोधन पपेरमध्ये हक्क, नागरिकत्व आणि आधुनिक राज्यसंस्था या तिन्ही संकल्पनांचा एकत्रित अभ्यास करून भारतीय परिप्रेक्ष्यात त्यांचे महत्त्व आणि आव्हाने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1. भारतातील नागरिकत्वाच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.
2. भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्कांचे स्वरूप आणि महत्त्व स्पष्ट करणे.
3. आधुनिक राज्यसंस्थेची भूमिका आणि कार्ये समजावून सांगणे.
4. नागरिकत्व, हक्क आणि राज्यसंस्था यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करणे.
5. आधुनिक काळातील सामाजिक व राजकीय आव्हानांच्या संदर्भात नागरिकत्व आणि हक्कांचे महत्त्व विश्लेषित करणे.

**विषय विवेचन :-**

**अ) भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क :**

भारतीय राज्यघटनेचा भाग-3 हा 'मूलभूत हक्कांचा मॅग्नाकार्टा' म्हणून ओळखला जातो. कलम 12 ते 35 मध्ये सहा मूलभूत हक्क दिले आहेत. हे हक्क केवळ नागरिकांचे संरक्षण करत नाहीत, तर राज्यसत्तेच्या मनमानीवर अंकुश ठेवतात.

1) **समतेचा हक्क (कलम 14-18):** कायद्यापुढे समानता, धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान याआधारे भेदभाव न करणे, सरकारी नोकऱ्यांत समान संधी, अस्पृश्यता निर्मूलन आणि उपाधी-मानपत्र रद्द करणे या तरतुदींचा समावेश आहे. हा हक्क लोकशाहीचा गाभा आहे.
2) **स्वातंत्र्याचा हक्क (कलम 19-22):** भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततामय सभा, संघटना, देशात कोठेही संचार, निवास आणि व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य या हक्कांचा समावेश होतो. हे हक्क नागरिकांच्या सर्जनशीलता व सामाजिक विकासाचे साधन आहेत.
3) **शोषणाविरुद्ध हक्क (कलम 23-24):** मानवी तस्करी, वेठबिगारी आणि चौदा वर्षांखालील मुलांना धोकादायक उद्योगात कामावर ठेवण्यास बंदी यांचा समावेश. हे हक्क समाजातील शोषित वर्गांसाठी विशेष संरक्षण प्रदान करतात.
4) **धर्मस्वातंत्र्याचा हक्क (कलम 25-28):** विवेकाचे स्वातंत्र्य, धर्माचरण, प्रसार, धर्मकार्यांसाठी संस्था स्थापणे आणि धार्मिक शिक्षणाचे व्यवस्थापन करण्याचे हक्क. भारतासारख्या बहुधर्मीय देशात हे हक्क सामाजिक सामंजस्यासाठी अनिवार्य आहेत.
5) **सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क (कलम 29-30):** अल्पसंख्याकांना आपली भाषा, लिपी व संस्कृती जपण्याचा आणि शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा अधिकार. सांस्कृतिक विविधतेचे जतन हे भारतीय लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे.
6) **घटनात्मक उपायांचा हक्क (कलम 32):** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या हक्काला "राज्यघटनेचा आत्मा" म्हटले आहे. मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेण्याचा हक्क. बंदी प्रत्यक्षीकरण, परमादेश, प्रतिषेध, अधिकारपृच्छा आणि उत्प्रेषण या पाच रिट याचिकांद्वारे न्यायालय हक्कांचे रक्षण करते.

**मूलभूत हक्क आणि सर्वोच्च न्यायालयाची भूमिका -**

सर्वोच्च न्यायालयाने विविध ऐतिहासिक निर्णयांद्वारे मूलभूत हक्कांचे संरक्षण आणि विस्तार केला आहे. केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य (1973) प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने "मूलभूत संरचना सिद्धांत" प्रतिपादित केला, ज्यानुसार संसद मूलभूत हक्कांसह राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेत बदल करू शकत नाही. मेनका गांधी विरुद्ध भारत सरकार (1978) प्रकरणात कलम 21 च्या व्याप्तीचा विस्तार केला गेला आणि "जगण्याचा हक्क" केवळ शारीरिक अस्तित्वापुरता

मर्यादित न राहता गरिमेने जगण्याचा हक्क म्हणून मान्य करण्यात आला. पुत्तास्वामी विरुद्ध भारत सरकार (1917) प्रकरणात खासगीपणाचा हक्क मूलभूत हक्क म्हणून मान्य केला गेला.

**ब) भारतातील नागरिकत्वाची संकल्पना :**

**1) नागरिकत्वाचा अर्थ आणि व्याख्या -**

नागरिकत्व म्हणजे एखाद्या व्यक्तीचे विशिष्ट राष्ट्राशी असलेले कायदेशीर बंधन, ज्यामुळे त्या व्यक्तीला विशिष्ट हक्क प्राप्त होतात आणि त्याच्यावर विशिष्ट कर्तव्ये लादली जातात. टी. एच. मार्शल (T.H. Marshall) यांनी नागरिकत्वाचे तीन आयाम सांगितले आहेत – नागरी हक्क (Civil Rights), राजकीय हक्क (Political Rights) आणि सामाजिक हक्क (Social Rights). भारतीय राज्यघटनेने या तिन्ही आयामांचा समावेश करून एक समग्र नागरिकत्वाची संकल्पना विकसित केली आहे.

भारतीय राज्यघटनेच्या भाग-2 (कलम 5 ते 11) मध्ये नागरिकत्वाच्या तरतुदी आहेत. राज्यघटनेच्या अमलात येण्याच्या वेळी भारतात राहणाऱ्या आणि भारतात जन्मलेल्या व्यक्तींना नागरिकत्व प्रदान केले गेले. नागरिकत्व कायदा, 1955 हा या विषयीचा मुख्य कायदा असून त्यात जन्म, वंश, नोंदणी आणि नैसर्गिकीकरण या मार्गांद्वारे नागरिकत्व मिळविण्याच्या तरतुदी आहेत.

**2) एकेरी नागरिकत्वाचे महत्त्व -**

भारत हे संघराज्य असले तरी घटनाकारांनी एकेरी नागरिकत्वाचे तत्त्व स्वीकारले. अमेरिकेत दुहेरी नागरिकत्व असताना भारतात मात्र सर्व नागरिक प्रथमतः भारतीय नागरिक आहेत. हे तत्त्व राष्ट्रीय एकता आणि समन्वय दृढ करण्यासाठी महत्त्वाचे ठरले आहे. राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक विविधता आणि प्रादेशिक अस्मिता यांचा समतोल साधताना एकेरी नागरिकत्वाचे तत्त्व कळीची भूमिका बजावते.

**3) नागरिकत्व दुरुस्ती कायदा, 2019 आणि वाद -**

2019 मध्ये संसदेने नागरिकत्व दुरुस्ती कायदा (Citizenship Amendment Act - CAA) पारित केला. या कायद्याने पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमधील हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन निर्वासितांना भारतीय नागरिकत्व देण्याची तरतूद केली. मात्र मुस्लिमांचा समावेश न केल्यामुळे या कायद्याविरुद्ध देशभर आंदोलने झाली. सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल झाल्या असून हा विषय अद्याप न्यायप्रविष्ट आहे. नागरिकत्व आणि धर्मनिरपेक्षता यांच्यातील संघर्ष या वादातून प्रकर्षाने समोर आला.

**क) आधुनिक राज्यसंस्थेची भूमिका आणि कार्ये :**

**1) कल्याणकारी राज्याची संकल्पना -**

आधुनिक राज्यसंस्थेची संकल्पना पारंपरिक "रात्रीच्या पहारेकऱ्या" च्या भूमिकेपासून "कल्याणकारी राज्या" पर्यंत विकसित झाली आहे. भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत "समाजवादी" हा शब्द 1976 च्या 42 व्या घटनादुरुस्तीद्वारे समाविष्ट करण्यात आला. राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये (भाग-4, कलम 36-51) राज्याच्या कल्याणकारी भूमिकेची रूपरेखा स्पष्ट केली आहे. सर्व नागरिकांना उपजीविकेची पुरेशी साधने मिळविण्याचा हक्क (कलम 39-अ), त्यामध्ये समान कामासाठी समान वेतन (कलम 39-ड), मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद (कलम 45, आता कलम 21-अ), कामाबाबत न्याय व मानवीय परिस्थिती आणि प्रसूतीविषयक सहाय्य यांची तरतूद (कलम 42) इत्यादींचा समावेश होतो.

**2) लोकशाही संस्था आणि प्रशासन -**

आधुनिक भारतीय राज्यसंस्था संसदीय लोकशाहीवर आधारित आहे. राष्ट्रपती, संसद, मंत्रिमंडळ, न्यायपालिका, निवडणूक आयोग, लेखा नियंत्रक व महालेखापरीक्षक, माहिती आयोग, मानवाधिकार आयोग इत्यादी संस्था एकत्रितपणे राज्यव्यवस्थेला जिवंत ठेवतात. नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण आणि राज्यसत्तेवर अंकुश ठेवण्याचे काम या संस्था करतात. तीन स्तरीय सरकार (केंद्र, राज्य, स्थानिक) मुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होते आणि नागरिकांपर्यंत शासन पोहोचते.

**3) न्यायपालिकेची स्वायत्तता आणि हक्कांचे संरक्षण -**

स्वतंत्र न्यायपालिका ही आधुनिक राज्यसंस्थेचा कणा आहे. भारतात सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालये आणि कनिष्ठ न्यायालयांचे त्रिस्तरीय जाळे आहे. न्यायपालिका नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करते, घटनात्मक तरतुदींचा अर्थ

लावते आणि कायद्याचे राज्य अबाधित राखते. जनहित याचिका ही भारतीय न्यायव्यवस्थेची विशेष देणगी आहे, ज्यामुळे सामान्य नागरिकही मोठ्या सामाजिक प्रश्नांसाठी न्यायालयात जाऊ शकतो.

**ड) हक्क, नागरिकत्व आणि राज्यसंस्था यांचा परस्परसंबंध :**

हक्क, नागरिकत्व आणि राज्यसंस्था या तीन संकल्पना एकमेकांशी घट्ट जोडलेल्या आहेत. नागरिकत्वामुळे व्यक्तीला हक्क मिळतात आणि कर्तव्ये सोपवली जातात. राज्यसंस्था हे हक्कांचे अभिभावक आहे; राज्य हक्कांची निर्मिती करते, संरक्षण करते आणि त्यांची अंमलबजावणी करते. या तिन्ही संकल्पनांचा परस्परसंबंध पुढील प्रकारे समजता येतो: (1) नागरिकत्वामुळे मतदानाचा हक्क, सरकारी नोकऱ्यांत प्राधान्य, पारपत्र मिळविण्याचा हक्क आणि इतर विशेष सुविधा मिळतात. (2) नागरिकांचे हक्क राज्यसत्तेवर बंधने लादतात आणि राज्याला जबाबदार बनवतात. (3) राज्यसंस्था नागरिकत्वाच्या अटी ठरवते, नागरिकांना संरक्षण पुरवते आणि त्यांच्या विकासासाठी धोरणे आखते.

**1) हक्क आणि कर्तव्यांचा समतोल -**

लोकशाहीत हक्क आणि कर्तव्ये या नाण्याच्या दोन बाजू आहेत. भारतीय राज्यघटनेच्या ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे (1976) कलम 51-अ अंतर्गत 11 मूलभूत कर्तव्ये समाविष्ट करण्यात आली. राज्यघटना, राष्ट्रगीत, राष्ट्रध्वजाचा आदर करणे, राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्याचे आदर्श जपणे, देशाची अखंडता टिकविणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे हे त्यापैकी काही महत्त्वाचे कर्तव्ये आहेत. 2010 मध्ये 'शिक्षणाचा हक्क' हे 11 वे कर्तव्य जोडण्यात आले. हक्क आणि कर्तव्यांचा हा समतोल लोकशाही राज्यव्यवस्थेच्या दीर्घकालीन स्थैर्यासाठी आवश्यक आहे.

**2) सामाजिक न्याय आणि आरक्षण धोरण -**

भारतात ऐतिहासिक अन्यायाची भरपाई करण्यासाठी आरक्षण धोरण राबविले जाते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी शिक्षण, नोकऱ्या आणि राजकीय प्रतिनिधित्वात राखीव जागा ठेवल्या जातात. हे धोरण नागरिकत्वातील असमानता दूर करण्याचे साधन आहे. मात्र आरक्षणाच्या मर्यादा, विस्ताराची मागणी आणि त्यावरील वाद हे समाजातील विभाजनाचे प्रश्नही निर्माण करतात. इंद्रा साहनी विरुद्ध भारत सरकार (1992) प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने 50% आरक्षणाची मर्यादा निश्चित केली.

**इ) आधुनिक काळातील आव्हाने :**

**1) जागतिकीकरण आणि नागरिकत्वाचे बदलते स्वरूप -**

जागतिकीकरणामुळे राष्ट्रीय सीमांचे महत्त्व कमी होत असताना नागरिकत्वाची संकल्पना अधिक जटिल बनत आहे. 'जागतिक नागरिकत्व' ही नवीन संकल्पना उदयास आली आहे. भारतीय वंशाच्या परदेशस्थ व्यक्तींसाठी 'प्रवासी भारतीय नागरिक' (Overseas Citizenship of India - OCI) ही विशेष श्रेणी तयार करण्यात आली आहे. मात्र ही OCI ची मर्यादित नागरिकत्व आहे - त्यांना मतदानाचा हक्क नाही. जागतिक श्रमबाजार, बहुराष्ट्रीय कंपन्या आणि आंतरराष्ट्रीय स्थलांतरामुळे नागरिकत्वाची व्याख्या पुन्हा तपासणे आवश्यक झाले आहे.

**2) डिजिटल हक्क आणि तंत्रज्ञान -**

डिजिटल युगात इंटरनेट प्रवेश, डेटा संरक्षण आणि ऑनलाइन अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे नव्या हक्कांचे प्रश्न निर्माण झाले आहेत. भारतात 'डिजिटल भारत' उपक्रमाद्वारे नागरिकांना डिजिटल सुविधा देण्याचा प्रयत्न होत आहे. आधार कार्ड, डिजिलॉकर आणि ई-गव्हर्नन्समुळे सेवा वितरण सुलभ झाले असले तरी डेटा चोरी आणि खासगीपणाच्या हक्काचा भंग होण्याचे धोके निर्माण झाले आहेत. इंटरनेट बंद आणि सोशल मीडिया नियमन हे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील आक्रमण म्हणून पाहिले जात आहे.

**3) स्थलांतर, निर्वासित आणि राज्यहीन व्यक्ती -**

भारतात अफगाणिस्तान, म्यानमार, तिबेट, श्रीलंका आणि बांगलादेशातून मोठ्या संख्येने निर्वासित आले आहेत. रोहिंग्या मुस्लिम, बौद्ध तिबेटी आणि तामिळ निर्वासितांचे प्रश्न अद्यापही सुटलेले नाहीत. भारताने संयुक्त राष्ट्रांच्या निर्वासित करारावर स्वाक्षरी केलेली नाही, त्यामुळे निर्वासितांच्या हक्कांबाबत कायदेशीर पोकळी आहे. "राज्यहीन" व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण कसे करायचे हा आधुनिक राज्यसंस्थेपुढील एक गंभीर आव्हान आहे.

**4) लैंगिक समानता, LGBTQ+ हक्क आणि लिंगाधारित भेदभाव -**

समानतेचे तत्त्व सर्वांना लागू होते असे राज्यघटना सांगते, मात्र प्रत्यक्षात लिंगाधारित भेदभाव अजूनही समाजात खोलवर रुजलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाने नवतेज सिंग जोहर विरुद्ध भारत सरकार (2018) प्रकरणात कलम ३७७ रद्द करून समलिंगी संबंधांना गुन्हा न ठरवण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला. मात्र समलिंगी विवाह कायदेशीर करणे, LGBTQ+ व्यक्तींना दत्तक घेण्याचा अधिकार आणि समान कामगार हक्क या प्रश्नांवर अजून पुरेशी प्रगती झालेली नाही. महिला सशक्तीकरण, हुंडाबंदी, घरगुती हिंसा, मजुरी भेदभाव आणि राजकीय प्रतिनिधित्व यांबाबत अजून बरीच मजल मारायची आहे.

**5) आदिवासी हक्क आणि पर्यावरणीय न्याय -**

विकासाच्या नावाखाली आदिवासी समुदायांच्या जमिनी, जंगले आणि नैसर्गिक संसाधने हिरावून घेतली जात आहेत. वन हक्क कायदा, 2006 ने आदिवासींना जंगलातील हक्क दिले, मात्र अंमलबजावणी अपुरी आहे. पर्यावरणीय ऱ्हासामुळे उपजीविका गमावलेल्या समुदायांच्या हक्कांचे संरक्षण हे आधुनिक राज्यव्यवस्थेपुढे गंभीर प्रश्न आहे. हवामान बदलाचे परिणाम सर्वांत जास्त दुर्बल व वंचित समुदायांवर होतात, त्यामुळे पर्यावरणीय न्याय (Environmental Justice) हा नागरिकत्व आणि हक्कांच्या चर्चेत महत्त्वाचा मुद्दा बनला आहे.

**निष्कर्ष :-**

भारताच्या संदर्भात नागरिकत्व, हक्क आणि आधुनिक राज्यसंस्था या तिन्ही संकल्पनांचा अभ्यास करताना एक गोष्ट स्पष्ट होते की लोकशाहीचे यश या तिन्ही घटकांच्या परस्पर समन्वयावर अवलंबून आहे. भारतीय राज्यघटनेने एक दूरदर्शी आणि मानवकेंद्री दस्तऐवज म्हणून नागरिकांना केवळ हक्कच नाही तर कर्तव्येही सोपवली आहेत.

नागरिकत्वाच्या संकल्पनेचा अभ्यास करताना लक्षात येते की भारताने एकल नागरिकत्वाच्या माध्यमातून विविधतेतील एकतेचे तत्त्व जोपासले आहे. मात्र नागरिकत्व दुरुस्ती कायद्यासारख्या वादग्रस्त कायद्यांमुळे धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. नागरिकत्व ही केवळ कायदेशीर संकल्पना नसून ती एक सामाजिक-राजकीय ओळख आहे, जी राष्ट्राच्या मूल्यप्रणालीशी जोडलेली असते.

मूलभूत हक्कांचे स्वरूप पाहता, भारतीय सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी हक्कांची व्याप्ती वाढवली आहे. जगण्याचा हक्क, शिक्षणाचा हक्क, खासगीपणाचा हक्क, स्वच्छ पर्यावरणाचा हक्क अशा नव्या हक्कांची सातत्याने जोड झाली आहे. हे दर्शविते की भारतीय राज्यघटना एक जिवंत दस्तऐवज आहे जी समाजाच्या बदलत्या गरजांनुसार अर्थ प्राप्त करते.

आधुनिक राज्यसंस्थेने कल्याणकारी भूमिका स्वीकारताना नोकरशाही, भ्रष्टाचार, अकार्यक्षमता आणि केंद्रीकरण या अडथळ्यांवर मात करणे आवश्यक आहे. पंचायती राज संस्था, माहिती अधिकार कायदा, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग यांसारख्या संस्थांनी लोकशाहीला अधिक समावेशक बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

सामाजिक व राजकीय आव्हानांच्या संदर्भात पाहता, जागतिकीकरण, डिजिटल क्रांती, हवामान बदल आणि सामाजिक विषमता यांमुळे नागरिकत्व आणि हक्कांच्या संकल्पना अधिक जटिल बनत आहेत. या आव्हानांना सामोरे जाताना राज्यसंस्थेने सक्रिय, उत्तरदायी आणि नागरिकाभिमुख भूमिका बजावणे अपरिहार्य आहे.

**संदर्भ :**

1)ऑस्टिन, ग्रॅनव्हिल. (भारती केळकर अनु.), (2013). 'भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशीला', डायमंड पब्लिकेशन, पुणे.

2)खोसला, माधव. (अवधूत डोंगरे अनु.) (2024). ‘भारतीय संविधान संक्षिप्त परिचय’, मधुश्री पब्लिकेशन, पुणे.

3)फडके, य. दि. (2004)‘भारतीय नागरिकत्व’, अक्षर प्रकाशन, पुणे.

4)भारताचे संविधान (2025). भारत सरकार, विधि व न्याय मंत्रालय.

5)Jain, M. P. (2021). Indian constitutional law (8th ed.). LexisNexis.

6)Granville Austin. (2010). Working a democratic constitution: The Indian experience. Oxford University Press.

7) Marshall, T. H. (1950). Citizenship and Social Class. Cambridge: Cambridge University Press

8) Chakravarti, Upendra. (2014). "Constitutional Rights and Judicial Activism in India", Journal of Constitutional Law, Vol. 5, pp. 45-78.

9) Kumar, Deepak. (2019). "Citizenship Amendment Act and Secular Democracy", Economic and Political Weekly, Vol. 54, Issue 50.

10) Supreme Court of India. (1973). Kesavananda Bharati v. State of Kerala, AIR 1973 SC 1461.

11)Supreme Court of India. (1978). Maneka Gandhi v. Union of India, AIR 1978 SC 597.

12) Supreme Court of India. (2017). Justice K. S. Puttaswamy v. Union of India, (2017) 10 SCC 1.

13) Supreme Court of India. (2018). Navtej Singh Johar v. Union of India, (2018) 10 SCC 1.

14) Supreme Court of India. (1992). Indra Sahani v. Union of India, AIR 1992 SC 477

15) Supreme Court of India. (1997). Vishakha v. State of Rajasthan, AIR 1997 SC